ISSN 2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC





# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal
**UGC Approved**

**Special Issue - September 2017**


म.शि.प्र.मंडळाचे

## सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव आयोजित

## आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचा विशेषांक

# हुंडा-एक समस्या : आव्हाने व उपाय

दि.११/०९/२०१७



बोडके बी.आर.
(संपादक)

डॉ.व्ही.पी.पवार
(प्राचार्य)

Scanned with OKEN Scanner

ISSN 2320-4494

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

Vol. I, Issue - I
*Special Issue, Sept. 2017*

Editorial Officer
**Shraddha Enterprises**
Infront of Tahsil Office,
Near Nilkamal Hotel,
Nagar Road,
Beed -431 122
Contact : 9420655507
E-mail : prakashkale.kale@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chancller Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralakar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Asst.Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed

**EDITOR BOARD**

**Dr.Shirish Patil**
Ex-Dean, Faculty of Arts
N.M.University Jalgaon

**Dr.Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vilas Khandare**
Ex-Dean, Faculty of Social Sciences
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Ashok Deshmane**
Head of Dept.Marathi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Asso.Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Appasaheb Humbe**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Ulhas Shinde**
Ex-Dean, Faculty of Engineering
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Pratibhatai Patil**
Ex-Management Council Member &
Professor & Head, Dept.of Pub.Ad
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Snehal Taware**
Ex-Chairman : BOS in Marathi
University of Pune, Pune

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr. Ratandeep Deshn**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Sukumar Bhandare**
Ex-Chairman, BOS in Hindi
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

Mr. Ramesh Ringne
Prof. Bapu Ghokshe
Mr. Shivaji Kakade
Dr. Shakur Shaikh Husain

Mr. Vinod Kirdak
Dr. Datta Tangalwad
Mr. Kalandar Pathan
Dr. Suhas Morale
Dr. Baliram Katare

Assit.Prof.Mohan Kalkute
Dr. Adgaonkar Ganesh
Dr. Santosh Chavan
Dr. Rajkumar Yallawad

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | हुंडाबळी विषयी प्रशासनाची भूमिका | डॉ. जिजाबाई कांगण | १६५ |
| ५३ | हुंडा बंदी कायदा - ऐतिहासिक अभ्यास | प्रा.डॉ.फसले जी.पी. | १६९ |
| ५४ | आदिवासींची हुंडा पध्दत : स्त्री जातीचा सन्मान | डॉ. भास्कर गायकवाड | १७४ |
| ५५ | हुंडाप्रथा : स्वरूप आणि मराठी साहित्यातील चित्रण | प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | १७७ |
| ५६ | नैतिक बदलाशिवाय हुंडाबंदी अशक्य | प्रा. सोमनाथ गुंजकर | १८२ |
| ५७ | हुंडा एक समस्या | प्रा. हंगरगेकर व्हि. एन. | १८४ |
| ५८ | हुंडाप्रथा : ऐतिहासिक पार्श्वभूमी | श्री. होगे राधाकिशन आंबादासराव | १८७ |
| ५९ | हुंडा प्रथा : कारणे, वास्तव, परिणाम व उपाय | प्रा.दिलीप रामचंद्र जाधव | १९० |
| ६० | हुंडा कुप्रथेवरील कायदेशिर उपाययोजना : एक अभ्यास | प्रा. डॉ. कळसकर एस.एन. | १९४ |
| ६१ | हुंडा : सामाजिक समस्या व उपाय | प्रा. घाटुळ महादेव सोपानराव | १९८ |
| ६२ | हुंडा एक सामाजिक समस्या | प्रा. सचिन प्र. कोठेकर | २०१ |
| ६३ | हुंडा पध्दती एक सामाजिक समस्या | कोकाटे पुष्पलता नामदेव | २०३ |
| ६४ | हुंडाप्रथा : भारतीय समाजव्यवस्थेला लागलेली भयंकर कीड कारणे, परिणाम व उपाय | प्रा.मोगल अनंत,<br>डॉ.शाम पवार | २०५ |
| ६५ | 'चिखलवाट': हुंडा समस्येचे चित्रण करणारी मराठी ग्रामीण कादंबरी' | प्रा.मोरे संगीता दत्ताजी | २०८ |
| ६६ | हुंडा एक सामाजिक समस्या व उपाय | प्रा.डॉ.गितांजली मोटे | २११ |
| ६७ | हुंडा : सामाजिक समस्या व उपाय | पाटील बसवराज,<br>बोकडे भगवंत चंद्रकांत | २१६ |
| ६८ | हुंडा प्रथा - कारणे - परिणाम - उपाय | प्रा. पाटील एस. एन. | २२० |
| ६९ | हुंडा प्रथा एक सामाजिक कलंकब | मा. विलास सोमाजी पवार | २२३ |
| ७० | हुंडा एक सामाजिक समस्या | मोकासरे गणेश तुकाराम | २२५ |
| ७१ | हुंडाबळी एक समस्या : कारणे व उपाय | कांबळे शरद पुंडलिक | २२८ |
| ७२ | हुंडाप्रथा : कारणे व उपाय | राठोड ज्ञानेश्वर गणपतराव | २३२ |
| ७३ | हुंडा : सामाजिक समस्या व उपाय | प्रा. ईश्वर एल. राठोड | २३४ |
| ७४ | हुंडा प्रथा : एक सामाजिक अभिशाप | प्रा. डॉ. आनंद शिंदे | २३८ |
| ७५ | हुंडाप्रथा : कारणे, वास्तव, परिणाम व उपाय | प्रा. सोळंके दत्ता सोपानराव | २४३ |
| ७६ | हुंडा प्रथा एक ज्वलंत सामाजिक समस्या | डॉ.जयदीप रा. सोळुंके | २४७ |
| ७७ | " हुंडा पध्दत सामाजिक समस्या " एक चिकित्सक अभ्यास | डॉ.सोनवणे श्रीराम विक्रमराव,<br>प्रा. बादाडे रविंद्रकुमार सुदामराव | २५१ |
| ७८ | हुंडा प्रथेचे साहित्यातील चित्रण | पा. सुर्यवंशी दीपक सुभाषराव | २५४ |


Scanned with OKEN Scanner

# हुंडाप्रथा : स्वरूप आणि मराठी साहित्यातील चित्रण

**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे**
मराठी विभाग प्रमुख,
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद

भारतीय समाजाचा सामाजिक अभ्यास ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. सामाजिक समस्या ही व्यापक अर्थ असणारी संज्ञा आहे. स्त्रियांच्या समस्याची व्याप्ती खूप मोठी आहे. हजारो वर्षापासून स्त्रियांना गुलामगिरीच्या अवस्थेत जावून जगावे लागत आहे. लिंगाधिष्ठीत असमानता हे भारतीय समाज जीवनातील एक वास्तव आहे. याच आधारावर सत्तास्थाने पुरूषाच्या हाती केंद्रित झाली आहेत. कुटूंबात स्त्रीयावर होणाऱ्या हिंसाचाराचे मूळ लिंगाधिष्ठीत असमानतेत आहे. आत्महत्येस प्रवृत्त होईल इतक्या गंभीर समस्या स्त्रीयांच्या संदर्भात आहेत. मुलगी म्हणजे कौटूंबिक आपत्ती व पूर्वजन्मीचे पाप समजले जाते. प्राचीन काळापासून स्त्रीयांना विविध स्वरूपाच्या सामजिक समस्या भेडसावत आहेत. त्यामध्ये सतीप्रथा, बालविवाह, केशवपण, घटस्फोट, विधवा पुर्नविवाह यासोबतच आज प्रकर्षाने कौटूंबिक हिंसेत समाविष्ट असणारी हुंडाबळीसारखी समस्या खूपच गंभीर आहे. स्त्रीजीवनाची कहाणीच भारतीय कुटूंबात दूर्दैवी आहे असे म्हणावे लागते.

हुंडा एक कर्करोग आहे. तो रोग कसा पसरत गेला याचा इतिहास लक्षात घेता तो असा दिसतो की, एकीकडे स्त्रीला देवता म्हणत दगडी मुर्तीचे रूप दिले तर दुसरीकडे तिच्या आशा-आकांक्षा, भावना, चेतना तिच्या देवीपणात गोठवल्या. स्त्रीवरील मालकी हक्काच्या भावनेतून कन्यादानाचा एक अर्थहीन आणि अन्यायी सोहळा जन्मास आला. कन्यादान महापुण्याचे असे गोंडस रूपही प्राप्त झाले. याच दानाच्या सोहळ्यातून एक भयंकर रिवाज अस्तित्वात आला. मानवतेचे, माणुसकीचे सगळे विचार या रिवाजानं भस्मसात केले. तो रिवाज हुंडा किंवा वरदक्षिणा या नावानं राजरोसपणे समाजात वावरू लागला. एवढेच नाही तर त्याला महान प्रतिष्ठा प्राप्त झाली. या हुंड्याने आपला अजस्त्र 'आ' पसरला आणि एकापाठोपाठ एक अशा अनेक स्त्रिया त्यानं गिळंकृत केल्या.

**हुंड्याचा अर्थ :**

१) मॅक्स रॉडीन, "विवाहप्रसंगी वर किंवा वधुला तिच्या आई-वडिलांकडून प्राप्त झालेली संपत्ती म्हणजे हुंडा होय."

२) वेबस्टरचा शब्दकोश, "विवाहाच्या वेळी स्त्री आपल्यासोबत जी संपत्ती, मौल्यवान वस्तु आणते त्याला हुंडा असे म्हणतात."

**हुंडाप्रथेची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

ही लक्षात घेता तिचे अस्तित्व प्राचीन काळापासून दिसते. धर्मग्रंथात देवदेवतांच्या विवाह वर्णनात वधुपित्याने वधुसोबत दिलेल्या मौल्यवान भेटवस्तुचा उल्लेख आहे. ही प्रथा शाही घराण्यात रूढ होती. पूर्वीच्या काळी स्त्रीधन आणि वरदक्षिणेच्या रूपात राजेराजवाडे आपल्या कन्येबरोबर दासदासी, सोनेरूपे, कलात्मक, शोभिवंत वस्तु, दागदागिणे भेटीदाखल स्वखुषीने पाठवित असत. धनिक वर्ग वैवाहिक संबंध जुळविण्यासाठी भरमसाठ वरदक्षिणा देत असत. परंतु पुढे कालांतराने हा सामाजिक रोग सर्वांना त्रासदायक ठरू लागला. भारतात वैदिक काळापासून ही पद्धत रूढ असल्याचे काही पुरावे मिळतात. जी हुंडाप्रथा फक्त राजघराणे, जमीनदार, जहागीरदार, श्रीमंत घराण्यापुरती मर्यादीत होती ती पुढे काळाच्या ओघात समाजाला जळुसारखी चिकटली. वरिष्ठ वर्गातून हळूहळू सर्वसाधारण वर्गापर्यंत विपुल स्वरूप धारण करत गेली. वधुपक्षाचे रक्त शोषू लागली आणि तरूण त्यास मान तुकवू लागल्याचे दिसून येते. त्यामुळे आजच्या या आधुनिक, वैज्ञानिक, भौतिकवादी जगात हुंड्याचे वाढलेले प्रस्थ अर्थात त्यातून हुंडाबळी एक मोठी समस्या उभी राहिली.

हुंडाप्रथा जनसामान्यात रूजण्याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये परंपरा, लिंगाधिष्ठीत विषमता, अंतर्विवाह नियम, प्रतिष्ठा, बदलती सामाजिक मूल्ये यांचा समावेश होतो. या कारणामुळे पुढे आलेल्या हुंडाप्रथेचे स्त्रीजीवनावर गंभीर

परिणाम होताना दिसतात. ज्यामध्ये शारीरिक, मानसिक छळ, वधुपित्याचा कर्जबाजारीपणा, स्त्रीभ्रुणहत्या, विजो घटस्फोट, व्यक्तिमत्त्व विकासात अडथळा, विवाहाचे बाजारीकरण आणि सर्वात मोठा गंभीर परिणाम म्हणजे नावाखाली मरणाऱ्या व मारल्या जाणाऱ्या स्त्रियांची वाढती संख्या. जी हुंडाबळी म्हणून ओळखली जाते.

'हुंडाबळी' या समस्येची गंभीरता काही घटकाकडून प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीवरून समोर येते. १९ भारत सरकारने दिलेल्या अहवालानुसार वर्तमान काळात भारतात दर १०२ मिनीटास हुंड्याशी संबंधीत एक ह म्हणजे एका दिवसाला ३३ व वर्षाला सुमारे ५००० हत्या हुंड्यासाठी होतात हे स्पष्ट होते. भारत सरकारच्या मे २० अहवालानुसार भारतात प्रत्येक ९० मिनिटात सरासरी हुंड्याशी संबंधीत १ हत्या होते. एका दिवसात सरासरी १६ वर्षात जवळपास ६००० पेक्षा जास्त हुंड्याशी निगडीत हत्या होतात. महाराष्ट्र शासनाच्या गुन्हे अन्वेषण विभागातर्फे २००१ च्या आकडेवारीनुसार हुंडाबळीची संख्या ३६२ सांगीतली. २०११ ते २०१४ या तीन वर्षाच्या काळात भारता २५,२४२ तर महाराष्ट्रात १,१६१ महिला हुंड्याच्या बळी ठरल्या आहेत. या बाबी हुंड्यासाठी होत असलेल्या हत्यांचे वाढत गेल्याचेच सुचवितात.

१९६१ च्या हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये हुंडा म्हणजे कोणत्याही पक्षाने लग्नापूर्वी किंवा लग्नानंतर दिलेल देण्याची मान्य केलेली कोणतीही मालमत्ता व मौल्यवान वस्तु होय. असे असले तरी त्यातून पळवाटा काढत अप्रत्यक्षपणे हुंडाप्रथा अधिक जाचक, दाहक समस्या बनलेली दिसते. साठोत्तरी स्त्री चळवळीने स्त्रीत्वाची स्वतंत्र करून दिली. त्यामध्ये सिमॉं दि बोवुवा म्हणतात की, "स्त्री जन्माला येत नाही; तर ती घडवली जाते." स्त्रीत्वाच सामाजिक जडणघडणीतच स्त्रीच्या शोषणाची बीजे अंकुरित होतात. पुढे ती शोषणवेल पुरूषसत्ताक व्यवस्था काळजी जोपासते. त्यामुळे या जडणघडणीला योग्य आकार देण्याचे काम स्त्रीचळवळीने केले.

**मराठी साहित्यातील चित्रण :**

स्त्रीदास्य विमोचनाची अर्थात हुंडाप्रथेशी संबंधीत प्रश्नावर समाजसुधारकांच्या बरोबरीने अनेक साहित्यिक लेखणीद्वारे चळवळ राबवली. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांच्यापासून ते छाया दातार, विद्या बाळ यांच्यापर्यंत स्त्रीवा अनेक वैशिष्ट्ये स्पष्ट होताना दिसतात. बाबा पद्मनजींची 'यमुनापर्यटन', हरिभाऊ आपटेंची 'पण लक्षात कोण किंवा श्री. व्यं. केतकरांची 'ब्राह्मणकन्या' या कादंबऱ्या स्त्रीसुधारणेच्या काळातील महत्वपूर्ण कलाकृती आहेत प्रथेला विरोध करण्यासाठी जानकीबाई देसाई यांनी 'गृहलक्ष्मी' ही कादंबरी लिहिली.

कुमूद पावडे यांच्या 'सावित्री व्रताची सांगता' या आत्मचरित्रातून हुंडाप्रथेवर प्रकाश पडलेला दिसतो. वयाच सत्तरी गाठलेल्या मायबाईच्या तोंडून स्त्रीछळाची कहाणी सांगीतली आहे. "आमचा काळ अतिशय वाईट. बराच हुं दिल्यानंतरही डोक्याला लावायचं तेल, अंगाच्या साबणासारख्या वस्तुही आम्हाला माहेरून आणाव्या लागत आणि अंगावरची पातळं, चोळ्या याबद्दल तर विचारूच नका. सासरी आम्हाला नवरा राहू देतो हाच मोठा उपकार वाटे." "दारिद्र्य हे लग्नाच्या बाजारात हेटाळणीचा व टवाळीचा विषय नाही?" हा प्रश्न उपस्थित केला. स्त्रीजीवनाच्या छळ परंपरेचा हा नमुना. एका छळानं स्त्रीजीवन कसे स्फुंदते याचे दर्शन घडते.

'अंत:करणाचे रत्नदीप' या मनोविश्लेषणात्मक कथेतून विभावरी शिरूरकरांनी मुख्यत: मध्यमवर्गातील मुलीं विवाह समस्येवर प्रकाश टाकला आहे. 'यमू' ही या कथेची नायिका. जी बौद्धिक पातळीवर हुशार पण बाह्यरूप चांगले नाही. केवळ बाह्यरूपास महत्व देणारी, एक प्रकारे किडलेली मानसिकता समाजात निर्माण झाल्याने स्त्रीजीवन खुरटे यमुसारख्या मुलीस लग्नाच्या माध्यमातून कटवायचा एक मार्ग म्हणजे हुंडा असल्याचे बऱ्याच वेळा या कथेत नजरेस पडते रंगरूपाची उणीव भरून काढण्यासाठी हुंड्याचे पारडे जड करावे लागते. ही मानसिकता हुंडाप्रथा वाढविण्यास कारणीभूत ठरते. या कथेत सुशिक्षीत वर्गही वधुची निवड बाह्यांग रूपावरून करतो हे अधोरेखित केले आहे. ज्यामुळे यमुस अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागते हे वास्तव आहे. लग्नासंदर्भातील बाह्यरूपाचा निकष मोठा दुरगामी परिणाम करतो. ही बाब कथा स्पष्ट करते.

कुरूप मुलींचीही लग्न लावली जातात पण ती दुसऱ्या पारड्यात हुंडारूपी मोठे धन टाकून. यासाठी वधुपित्याकडे इच्छाशक्ती असावी लागते. तीही आपल्याकडे नाही हा विचार करून यमू आंतरजातीय विवाहाचा निर्णय घेते. मुच्या बाह्यसौंदर्यावर लक्ष केंद्रित करून निवड होते. हा एक प्रकारे लग्नाचा बाजारच लेखिकेला वाटतो. तो प्रस्तुत कथेतील नायिकेच्या तोंडून मांडला. यमु म्हणते, "आमच्यात हुंड्याचे बंड तर काही विचारायलाच नको. ाला हुंडा हवा. पण घर पहायला गेले तर बाहेरून जितका भपका तितकेच आतून पोकळ झालेले. मग आम्ही तर शेतीतली माणसे. बरे दीड-दोन हजारांची भाषा तर आमच्यात कोणीच बोलत नाहीत. जो उठतो, तो चार-पाच बोलायचा. अशा स्थितीत आईबापांना मुलगी पदरी असणे हे पूर्वजन्मीचे पातक वाटल्यास नवल काय!" किंवा हिंदू लग्न म्हणजे सट्टेगिरी अशा स्थितीत माझ्यासारख्या कुरूप मुलीला हुंडा देण्याचे सामर्थ्य नसेल तर तिने भानगडीत पडू नये, असे म्हणणारे पाषाण-हृदयी लोक काही थोडे नसणार!" त्यामुळे मुलीच्या व तिच्या मातापित्यांच्या व काळजीला सीमाच नसते. हा भाव व्यक्त केला आहे.

१९६० नंतर ठळकपणे पुढे आलेला 'स्त्रीवादी साहित्य' हा एक प्रमुख प्रवाह आहे. त्यामध्ये विदर्भात स्त्रियांच्या क न्यायाची कृतीशील चळवळ राबवणाऱ्या तसेच निर्भिड व्यक्तीमत्वाच्या स्त्रीवादी साहित्यीक डॉ. सीमाताई साखरे ज्यांनी स्त्रीसमस्येवर विपूल लेखन केले. हुंडाप्रथेसंदर्भात 'माणूस म्हणून जगण्याचं स्वप्न' या कवितेतून प्रकाश

"आमच्या या महान संस्कृतीत
आणि कुटूंब पद्धतीत
विवाहाचे व्यापारीकरण
आणि हुंडापद्धतीचे संस्कृतीकरण
झालेले, विवाहाचे बाजार खूप
तेजीत चालले आहेत. पण
आतषबाजीत झालेल्या विवाहात
दोन वर्षात तीन-तेरा वाजताहेत."

ना माणूस म्हणून जगू द्यावे हा प्रधान विचार मांडताना विवाहास व्यापारीकरणाचे, बाजारू स्वरूप आल्याचे सांगतात. अशा विवाहाचे तीन-तेरा वाजताना दिसतात. या सर्व घडामोडीत स्त्रीच्या भावविश्वाचा चक्काचूर होतो. हुंड्यासारखी प्रथा विवाहाची एक अट बनल्याने अनेक स्त्रियांचे बळी गेलेत. त्यामुळे आज हुंडा व हुंडाबळींची संख्या ज्वलंत समस्या आहे. म्हणूनच सीमा साखरे समाजाला धोक्याचा इशारा देताना म्हणतात,

"अशुभ अमंगल सावधान!
खरीदलेले वधुवर सावधान
हुंड्यापायी मुलीचा छळ होईल
हुंडाबळी जाई सावधान."

कसे पुरूषाच्या मर्जीने व्यवस्थित चालल्याचे दर्शवितात. केवळ हुंडा विरोधी कायदे करून प्रश्न मिटत नाहीत. तर जाची मानसिकता बदलने गरजेचे आहे.

खरे तर आत्मभान हे आत्मस्थिती, आत्मगतीची जाणीव देत राहते. ही जाणीव लादलेल्या सर्वंकष गुलामगिरीच्या अन्यायी प्रवृत्तीच्या ओझ्याचं मूल्यमापन करायला लावते. आपल्या वाट्यास आलेल्या दुःखाच्या कारणांचा शोध घेला प्रवृत्त करते. या दृष्टीने उमा गावई यांच्या 'पाचवी भिंत' या काव्यसंग्रहाकडे पहावे लागते. स्त्रीजीवनाच्या सौष्ठवाची ता म्हणजे हा काव्यसंग्रह होय. असे हर्षिकेश कांबळे म्हणतात. संस्कारातून नितीअनीतीचे धडे देण्याचे, हक्काची णीव करून देण्याचे संस्कार केले जातात. हुंडा देणं अथवा घेणं हा कायदेशीर गुन्हा मानला गेला तसा दुराचारही आहे हे

ही सांगितलं गेलं. राज्यघटनेतील समता तत्त्वाप्रमाणे प्रत्यक्ष समान वाटा दिलाच जातो असे चित्र नाही. मुलांना अधिकार व मुलींनी समंजसपणा दाखवावा अशी भावना असते. अशावेळी जेंव्हा मुलगी समतेसाठी सिद्ध होते हक्काची जाणीव करून देणारेच विरोध करतात हे वास्तव आहे. याचा संताप उमा गवई कवितेतून व्यक्त करतात.

"हुंडा घेणाऱ्याशी मी लग्न करणार नाही
धन्याच्या लोभ्याला मी कधीच वरणार नाही."

आपल्या अस्तित्वाची जडणघडण करताना वाट्यास येणाऱ्या कचखाऊ संस्कारशीलतेची वृत्ती वरपांगी व तकलादू पुरूषप्रधान मानसिक गुलामगिरीत मोठ्या कौशल्याने फसविण्याची दांभिकता दिसते. समाजाच्या या दुटप्पी मानसिकतेचा कठोर वेध कवयित्री घेते. हुंडाप्रथेवर अनेक लेखकांनीही चिंतन मांडले. त्यामध्ये गणेश आवटे यांची 'कागुद' कथा येते. कथेचा नायक प्रल्हाद भीमाजी काकडे परिस्थितीशरण असून तो कर्जापोटी आपलं वावर लिहून देतो. परिस्थिती व प्रथा यापुढे माणूस कसा हतबल होतो याचे दर्शन ही कथा घडवते. जयवंत दळवींचे 'पर्याय' हे नाटक या दृष्टीने कौतुकास्पद ठरले. या प्रथेचे विदारक स्वरूप, त्यामागील स्वार्थलोलूप वृत्ती यांचे यथार्थ दर्शन घडवले आहे. तसेच या प्रथेवर मात करण्याचा प्रभावी मार्गही सुचवला आहे. तो म्हणजे तुमच्या आमच्या प्रवृत्तीत बदल होणे अधिक महत्त्वाचे आहे. स्त्री पुरूषापेक्षा कनिष्ठ, त्याची भोगदासी यासारख्या विकृत संकल्पना दूर होवून ती पुरूषाची सहधर्मचारिनी, संसाररथाचे चाक, इतकेच नव्हे तर पुरूषाची जन्मदात्री आहे. याचे भान समाजाने ठेवावे. लग्नसंस्था समानतेच्या पायावर उभी रहा

प्रा. नामदेव मानुरे यांचे 'जाऊ कशी मी नांदायला' हे नाटक अस्पृश्यता, दारूबंदी तसेच हुंडा प्रथेसारख्या सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकते. या प्रथेतून हुंडाबळीसारखा प्रश्न निर्माण झाल्याने स्त्री ही सासरी नांदायला जाताना जाऊ कशी मी नांदायला? असा खुप मोठा प्रश्न उभा करते. याची प्रखर जाणीव हे नाटक करून देते. प्रत्येक नवविवाहित स्त्रीमनाची चिंता सुशीलेसारख्या नायिकेच्या माध्यमातून दाखवून दिली. ती म्हणते, "प्रश्न पसंदीचा नाही! प्रश्न श्रीमंतीचा आणि गरिबीचा. प्रश्न आहे तुझ्या आईच्या नातेवाईकांच्या मर्जीचा. प्रश्न आहे मान सन्मानाचा! प्रश्न आहे समाजाचा, प्रश्न आहे हुंड्याचा. आज या समाजात हुंड्याबद्दल इतकी आपुलकी आहे की ते दररोज पेपरमध्ये वाचायला मिळते. सासुच्या जाचाला कंटाळून रेल्वेखाली आत्महत्या. नवऱ्याने पत्नीला स्कुटरसाठी जाळले. सासऱ्याने सुनेला विहिरीत लोटले. अशा कितीतरी बातम्या वाचायला मिळतात. हे सर्व पाहिलं की वाटतं मी एका गरीब पित्याची स्वाभीमानी मुलगी माझं लग्न होईल का? लग्न झालं तरी नांदायला कशी जाऊ? याची भीती वाटते मला."

ही भीती पुढे खरी ठरताना दिसते. सुशीलेची सासु पारू व उल्हाससारख्या खलनायकाच्या वृत्तीतून तिचा अनन्वित छळ होतो. नव्हे तिचा बळी घेतला जातो. माहेरहून पन्नास हजार रूपये घेऊन येण्याच्या लोभासाठी विष पाजून मारले. हुंडाबळीचा आक्रोश ऐकवण्याचे काम नाटककाराने केले. यामुळे स्त्रीजीवन कधी सुधारणार हा प्रश्न सतावतो. तसे सुशीलेच्या पोटी जन्मलेली छोटीशी मुलगी उद्या मोठी झाल्यावर तिला तिच्या आईची जीवनकथा सांगीतली तर लग्न ाल्यास ती सुद्धा जाऊ कशी मी नांदायला! हाच प्रश्न विचारणार. याचा कुठेतरी गंभीरपणे विचार झाला पाहिजे नाटककारास वाटते.

सुशीलेचा बाप 'आबा' हा मुलीच्या लग्नाच्या चिंतेने खचून जातो. हुंडा हा गरिबीस परवडणारा नसल्याने मुलगी म्हणजे एक ओझं वाटू लागले. कर्ज काढून मुलीला शिक्षण दिले, त्यात पुन्हा हुंडा देवून लग्न करणे म्हणजे महाकठीण काम हे या नाटकात 'आबा' सारखा पिता उभा करून पटवून दिले. लेखक काही उपायही सुचवतो. तो म्हणजे कायद्यात काही बदल करून पुरूषांनी पत्नीच्या घरी नांदायला जाण्याची पद्धत जर निघाली तर काय होईल? हा प्रश्न किंवा उपाय हुंडाबळी गेलेल्या मुलीच्या बापाचा आहे. समाज व न्यायालयाला या प्रश्नाचे उत्तर देणे गरजेचे बनले आहे. अन्यथा सुशीलेसारख्या अनेक स्त्रीया हुंडाबळीचा भाग होतील.

याशिवाय लोककवी वामनदादा कर्डक हुंडा प्रथेवर भाष्य करतात. १९६० पूर्वी चैनीच्या वस्तु किंवा सुट नव्हते. अशा वेळी एखादा उंटावरचा शहाणा (नवरदेव) जेंव्हा लग्नाच्या निमित्ताने वधुपित्याकडे सुटाबुटाची मागणी करी

...गरीबीत जगणाऱ्या वधुपित्यास ते परवडणारे नसते. त्यामुळे संतापलेला वधुपिता वरपित्यास म्हणतो,

"गरिबीमधी कुठून आणू सुटाड अन बुटाड

तुमचं आमचं जमायचं नाही हाकला तुमचं उटाड."

...जेथे लाज झाकायला वस्त्र मिळणे मुश्किल तिथे सुटबुट कुठून आणणार? या प्रश्नाचा विचार देखील होणे गरजेचे आहे. ...अशाप्रकारे हुंडाप्रथेशी संबंधीत परिणामांची अर्थात हुंडाबळीची समस्या, तिचे स्वरूप आणि मराठी साहित्याने घेतलेला वेध ...दर्शनास येतो.

**...निष्कर्ष :**

मानवी समाजाइतक्याच सामाजिक समस्या प्राचीन आहेत. त्यामध्ये भारतातील स्त्रीयांच्या समस्यांची व्याप्ती ...मोठी आहे. लिंगाधिष्ठीत असमानतेच्या वास्तवातून स्त्रीयांवर मोठ्या प्रमाणात कौटूंबिक हिंसाचार होताना दिसतो. या ...हिंसाचारास हुंडापद्धती कारणीभूत असल्याचे लक्षात येते. यातून हुंडाबळीसारखी गंभीर समस्या आज स्त्रीसमोरील फार ...मोठे आव्हान बनली आहे. केवळ राजघराण्यापुरती मर्यादित असणारी हुंडा प्रथा पुढे सर्वसाधारण स्तरापर्यंत झिरपत गेली. ...ही हुंडाप्रथा सार्वत्रिक व सर्वव्यापी बनलेली दिसते. जनसामान्यात रूजलेल्या हुंडा प्रथेने स्त्रीजीवनास गंभीर हानी पोहोचवली. ...हे विविध सामाजिक संस्था, शासकीय स्तरावरून प्रसिद्ध केलेल्या हुंडाबळीच्या आकडेवारीवरून सिद्ध होते. या समस्येवर ...मात करण्यासाठी आत्मभान निर्माण झालेल्या स्त्रीयांनी साहित्य निर्मिती करून स्त्रीसुधारणावादी चळवळीस वेग दिला. ...ज्यामध्ये कुमूद पावडे, विभावरी शिरूरकर, डॉ. सीमा साखरे व उमा गवई यांचे लेखन लक्षणीय ठरते. तसेच हुंडाप्रथेची ...दाहकता पटवून देण्याचे कार्य लेखकांनीही केले. त्यात जयवंत दळवी, लोककवी वामनदादा कर्डक तसेच प्रा. नामदेव मानुरे ...यांचे चिंतन प्रभावी ठरते.

भारतीय समाजाला कलंकीत करणारी हुंडाप्रथा अर्थात हुंडाबळी ही समस्या होय. ज्यामुळे आज मुलींचा जन्मच ...नाकारला जातो आहे. अशी स्थिती आहे. त्यामुळे स्त्रीवादी साहित्य समता मूल्याचा पुनरूच्चार करते. हे समाजाने स्वतःहून ...जन्माला घातलेले हुंडारूपी अपत्य विशेषतः समाजाच्या विनाशास कारणीभूत ठरले आहे. हुंडा केवळ आर्थिक स्वरूपाचा असल्याने सामान्य कुटूंबाची अडचण होते. हुंडा एक विवाहाची अट व श्रीमंतीचा अविभाज्य घटक बनल्याने सामान्यांची अडचण होते. याचाही सर्वांनी विचार करणे गरजेचे असल्याचे साहित्यीक सुचवतात. सर्व प्रश्न केवळ कायद्याने सुटत ...नाहीत. त्यासाठी मानसिकता बदलने, स्त्रीयांनी आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे. नवविवाहिता केवळ तिच्या पित्याचीच कन्या ...नाही तर सर्व समाजाची कन्या आहे. ही संस्कृती आपल्यात रूजली पाहिजे.

**संदर्भ :**

१) प्रा. अशोक गोरे, 'भारतीय सामाजिक समस्या', विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जून २०१५.
२) डॉ. दा. धों. काचोळे, 'भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १७ सप्टेंबर २००५.
३) 'स्वातंत्र्योत्तर काळातील निवडक वाङ्मय', प्रकाशक य.च.म.मु.वि. नाशिक, प्रथम प्रकाशन, ऑगस्ट २००१.
४) डॉ. सीमा साखरे, 'बाई', सीमा प्रकाशन, नागपूर, आवृत्ती १५/०८/२००३.
५) उमा गवई, 'पाचवी भिंत', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००७.
६) (संपा.) मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, 'कथात्म साहित्य', एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, आवृत्ती जुन २०१३.
७) प्रा. नामदेव मानुरे, 'जाऊ कशी मी नांदायला', क्वालिटी पब्लिकेशन्स, लातूर, प्रथमावृत्ती मार्च २००५.



Scanned with OKEN Scanner